## जनता शिक्षण मंडळाचे

श्रीमती इंदिराबाई जी. कुलकर्णी कला, जे. बी. सावंत विज्ञान आणि
सौ. जानकीबाई धोंडो कुंटे वाणिज्य महाविद्यालय
कै. नानासाहेब कुंटे शैक्षणिक संकुल
अलिबाग-रायगड (महाराष्ट्र).

मुंबई विद्यापीठाशी कायमस्वरूपी संलग्न - नॅकद्वारा पुनर्मुल्यांकन 'ब' श्रेणी (तृतीय चक्र)


मुंबई विद्यापीठ, फुले-आंबेडकर अध्यासन आणि
जे. एस. एम. महाविद्यालय, अलिबाग-रायगड (महाराष्ट्र)
भाषा व सामाजिक शास्त्र विभाग व आय.क्यू.ए.सी. यांच्या संयुक्त विद्यमाने

'गुलामगिरी' ग्रंथ व सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित
दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र
(दि. १३ आणि १४ जानेवारी २०२३)

# सत्यशोधकीय चळवळ आणि साहित्य

## MFNC 2023 Proceedings




ISBN 978-93-100-0078-8


डॉ. अनिल क. पाटील
प्राचार्य
जे. एस. एम. महाविद्यालय, अलिबाग-रायगड (महाराष्ट्र)


CamScanner

# सत्यशोधकीय चळवळ आणि साहित्य

## अनुक्रमणिका


| क्र. | शीर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्यातील लेखनशैली | डॉ.भाऊसाहेब नन्नवरे | ९ |
| २. | सत्यशोधक चळवळ आणि जातिअंताचा प्रश्न | डॉ. आय. पी. कोकणे | १५ |
| ३. | 'तृतीय रत्न' नाटकाचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून वाचन | कु. श्रेया पांचाळ | २२ |
| ४. | महात्मा जोतीबा फुले यांचे सार्वजनिक सत्य धर्म: धर्मचिंतनाचे सार | प्रा. सुप्रिया धुमाळ<br>डॉ. प्रविण गायकवाड | २८ |
| ५. | महात्मा फुले यांचे वैचारिक चौकटीत आदिवासींची शेती आणि शेतकऱ्यांचा चिकित्सक अभ्यास | प्रा. के. बी. चौगुले<br>डॉ. सी. जे. देशमुख | ३३ |
| ६. | महात्मा जोतीराव फुले यांच्या वैचारिक लेखनामागील संदर्भ : 'शेतकऱ्याचा असूड' | प्रा. भरतकुमार भालेराव | ३६ |
| ७. | सत्यशोधक समाज: भाऊराव पाटील आणि त्यांचे शैक्षणिक योगदान | प्रा. विजया ठाकूर | ४१ |
| ८. | म. जोतीराव फुले व 'शेतकऱ्याचा असूड' | डॉ. संजय चिताळकर | ४६ |
| ९. | नारायण मेघाजी लोखंडे यांची कामगार चळवळ | डॉ. बालाजी डिगोळे | ५० |
| १०. | थोर शिक्षण तत्वज्ञ - महात्मा ज्योतिबा फुले | डॉ. बन्सीलाल गाडीलोहार | ५७ |
| ११. | सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार | डॉ. चंद्रशेखर भगत | ६२ |
| १२. | महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज | श्रीमती सीमा भोसले | ६७ |
| १३. | महात्मा जोतीराव फुले यांचे आर्थिक व शेतीविषयक विचार | डॉ. नितीन मुटकुळे | ७१ |
| १४. | म. फुले यांचे शिक्षणविषयक विचार | डॉ. अनिल बांगर | ७५ |
| १५. | महात्मा फुले यांच्या विचारांची सद्यकालीन उपयुक्तता | प्रा. महेश बिन्हाडे<br>प्रा. पराग पाटील | ८० |
| १६. | महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार | प्रा. ज्ञानेश्वर नामदेव खिलारी | ८५ |
| १७. | नारायण मेघाजी लोखंडे यांची कामगार चळवळ | प्रा.हरेंद्र विनायक सोष्टे | ८९ |
| १८. | सत्यशोधक समाज चळवळ आणि सावित्रीबाई फुले यांचे योगदान | प्रा. रिझवाना शानूर मूलाणी | ९३ |
| १९. | शिक्षा के क्षेत्र में महात्मा ज्योतिराव फुले का योगदान | प्रा.अस्मिता भगवान पाटील | ९८ |
| २०. | फुले जी के गुलामगिरी में ब्राह्मण वर्ग | महानंदा अमृत शिंधे | १०४ |


CamScanner

# म. फुले यांचे शिक्षणविषयक विचार

डॉ. अनिल बळीराम बांगर

मराठी विभाग प्रमुख
को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी
महिला महाविद्यालय-पेझारी,
ता. अलिबाग, जि. रायगड
भ्रमणध्वनी : ९०२८०९२१११

**प्रास्ताविक:**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात जे समाजसुधारक आणि समाजचिंतक होऊन गेले त्यात महात्मा ज्योतिराव फुले यांचे स्थान अग्रक्रमाने घ्यावे लागेल. इतर समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी सामाजिक प्रश्नांकडे थोड्या अंतरावरून पाहिले पण महात्मा फुले हे प्रत्यक्षत: सामाजिक संघर्षात उभे होते. इतरांची भूमिका प्रबोधक व सुधारकांची होती.. महात्मा फुले हे केवळ प्रबोधक व सुधारक नव्हते वस्तुतः त्यांनी एका चिंतनशील सामाजिक क्रांतीवादयाची भूमिका स्वीकारली होती आणि म्हणून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील सामाजिक क्रांतीचे धुरीणत्व नि:संदिग्धपणे त्यांच्याकडे जाते. इतर विचारवंतांनी केवळ प्रबोधन कार्यालाच सुधारणा मानले. प्रबोधनाला देखील सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असणारी एक विमोचक शक्ती प्राप्त होत असते. पण केवळ प्रबोधन म्हणजे परिवर्तन नव्हे. महात्मा फुले यांचा अपवाद वगळता महाराष्ट्रातील इतर समाजचिंतकांचा सुधारणावाद हा केवळ प्रबोधनाच्या पायावर उभारलेला होता. महात्मा ज्योतिराव फुले हे बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते.

इसवी सन १८२० ते अठराशे १८७० पर्यंतचा पन्नास वर्षांचा मराठी वाड.मयाचा काळ हा आधुनिक मराठी वाड.मयाचा पूर्वतयारीचा काळ ओळखला जातो. इ.स. १८७५ पासून मराठी साहित्याला आधुनिकता प्राप्त होत गेली असे आपण मानतो. आधुनिक भारतात समाज प्रबोधनाचे जे युग जन्माला आले ते ब्रिटिश सत्तेमुळे हे आपल्याला मान्य करावे लागते. ब्रिटिश अमदानीत या ठिकाणी जे शिक्षण आणि ज्ञान उपलब्ध झाले ते बुद्धिवाद व उदारमतवाद यावर आधारलेले होते.

महात्मा ज्योतिराव फुले एक दृष्टे, योद्धा आणि समाज क्रांतिकारक होते. महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक विद्रोही व्यक्तिमत्व होते. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्र आमूलाग्र स्वरूपात बदलत होता. राजकीय सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था मध्ये परिवर्तन होत होते. भारतीय समाजाच्या लौकिक जीवनात झालेल्या उलथापालथीचा हा काळ मानला जातो. राजकीय स्थितीमध्ये बदल झालेला होता ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाली होती त्यामुळे समाज जीवनात आणि लोकांच्या मानसिकतेत जरी बदल अत्यंत धिम्या गतीने होत असले तरी या कालखंडात महाराष्ट्राची वाटचाल ठळकपणे मध्ययुगाकडून आधुनिक कालखंडाकडे होताना दिसते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा पुरस्कार करणारे आणि आपल्या व्यक्तिगत जीवनात त्यांचा अंगीकार करणारे महात्मा ज्योतिराव फुले हे महाराष्ट्राच्या आधुनिकतेला दिशा देणारे एक दृष्टे विचारवंत होते. महात्मा फुले यांचा जीवन काळ हा



ISBN 978-93-100-0078-8



CamScanner

महाराष्ट्राच्या दृष्टीने प्रबोधनाचा काळ समजला जातो. महाराष्ट्राच्या या प्रबोधनाच्या काळात क्रांतिकारी विचार मांडणारा त्याचप्रमाणे सामाजिक क्रांतीला चालना देणाऱ्या चळवळी उभारणारा कर्ता समाजसुधारक आणि विद्रोही विचारवंत म्हणून सबंध महाराष्ट्राला म.फुले परिचित आहेत.

**शैक्षणिक कार्य:**

शिक्षण हा जीवनाचा आधार आहे. शिक्षणापासून आपण आपणास वेगळे करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. केवळ त्याच्याकडून आपण काय घ्यावे हे आपणास कळायला पाहिजे. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे, जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे, जीवन पूर्ण कसे करावे. आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय दयावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच 'शिक्षणानेच सर्व काही होत आहे, त्याकरिता आधी शिक्षण घेतलेच पाहिजे'

जीवन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे आणि आपल्या सर्व थोर शिक्षणतज्ज्ञांनी, विचारवंतांनी, समाजसुधारकांनी जीवन शिक्षणाची धुरा सांभाळली आहे आणि सर्वांना जगण्याची एक दशा आणि दिशा देण्याची महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. २१ व्या शतकामध्ये शिक्षण घेणारा समुदाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पण त्यातून जीवनविषयक शिक्षण मिळत आहे काय? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. तेव्हा आपल्या शिक्षणतज्ज्ञांचे आजच्या शिक्षणातून व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार निश्चितच येणा-या भविष्यकालीन समस्यांचे निराकरण व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतील. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले यांचे  विचार मार्गदर्शनपर आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार -स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते.त्यांनी मेकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजांचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता.'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांनाशिक्षण दयावे 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणली असण्यावर म.फुले यांचा आग्रह होता.

म.फुले यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यावर भर दिला. प्राथमिक शिक्षकांची तरतूद करणे प्राथमिक शिक्षणास मोफत व सक्तीचे केल्यास विदयार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता होती आणि त्याकरिता दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे देखील आवश्यक आहे आणि त्याकरिता प्रथम आवाज उठविणारे म. फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. त्यामुळे या स्तरावरील शिक्षण उत्तम दर्जाचे असावे. यावर अधिक भर देण्यात आला.

प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे सरकारी नोक-यांमध्ये सर्व वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी - आहे, असे दिसून आल्यावर शिक्षण खालच्या वर्गातील तळागाळातील लोकांना मिळावे. यासाठी म. फुले यांनी प्राथमिक शिक्षण खालच्या वर्गास देण्यावर अधिक भर दिला. उच्च शिक्षणाकडे कमी व ग्रामीण जनतेच्या



ISBN 978-93-100-0078-8

J. S. M. College, Alibag-Raigad (M.S.) 402 201

CS CamScanner

प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणातून उद्याची भावी पिढी घडत असते आणि आज जे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. त्यामागे म. फुलेंचे विचार, असलेले दिसून येतात. आपल्या देशामध्ये आजची परिस्थिती लक्षात घेता कमी शिकलेले अध्यापक व अनुभव कमी असलेले शिक्षक प्राथमिक स्तरावर अध्यापन करताना दिसतात आणि अधिक अनुभवी व विषयतज्ज्ञ अध्यापक वर्ग वरच्या वर्गास अर्थात उच्च स्तर अध्यापन करतात. तेव्हा वेळोवेळी प्राथमिक शिक्षण अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देणे ही काळाजी गरज बनली आहे आणि त्या दृष्टीकोनातून विचार म. फुलेंनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण बहुजन समाज ग्रामीण भागामध्ये राहत असल्याने, त्यांच्या शिक्षणाची म. फुले यांना अधिक काळजी वाटत असे. २ मार्च १८८८ मध्ये म. फुले म्हणाले होते की आपली बहुतांश जनता खेड्यात निवास करते. तेव्हा शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण आपल्या देशात बहुजन समाज अजाण व अडाणी आहे. त्यांच्या उद्धारासाठी शिक्षण हा एकमेव उपाय आहे. शुद्रांना शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय राष्ट्र बनू शकत नाही. ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर अधिक भर होता.

**शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल** :- म. फुले यांच्या मते आजची शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणपासून वंचित करणारी होती. तेव्हा शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर दिला गेला. केवळ कारकून वर्ग तयार करणा-या वर्गाची निर्मिती शिक्षणातून होऊ नये, तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनवणारे उदद्योगी, जीवनोपयोगी शिक्षण देण्यात यावे.त्रिभाषा सूत्राचा अवलंब - (१९६४-६६) च्या कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्रास जरी आजच्या कालावधीत मान्यता दिलेली असली तरी या अगोदर ७७ वर्षांपूर्वी म. फुले यांनी त्रिभाषा सूत्राचा अवलंब शिक्षणात करावा यावर भर दिला होता. शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा जनसामान्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा - ह्यासाठी खेड्यापाड्यातील जनतेला शिक्षण घेता यावे म्हणून वसतिगृहाची व्यवस्था करण्याची कल्पना म. फुले यांनी मांडली आणि गरीब, होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा देण्यावर भर दिला.

शिक्षणाविषयक ज्ञान व विचार शिक्षण हा तिसरा डोळाच मानले जाते आणि - त्यामुळेच म. फुले यांनी शिक्षणावर अधिक प्रकाश टाकला आहे आणि शिक्षण कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी न बनता, सर्वांना शिक्षण मिळावे, शिक्षणाचा प्रसार होऊन, ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी म. फुलेंनी योगदान दिले. म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागासलेल्या अनाथाच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालगृहाची स्थापना देखील केली. अशाप्रकारे म.फुले यांनी स्वतःच्या घरादाराचाही विचार न करता काम केले आणि म्हणून आज आपला समाज मानाने सर्व प्रकारचे शिक्षण घेत आहे. या थोर महापुरुषांचे सामजिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्वरूपातील विचार आपल्याला प्रेरित व प्रोत्साहित करीत असतात. त्याचे विचार २१ व्या शतकात आपल्या विदयार्थी वर्गाला नव्याने देणे आवश्यक आहे.

महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत:

विद्येविना मती गेली।



ISBN 978-93-100-0078-8



CamScanner

मतीविना नीती गेली।

नीतीविना गती गेली।

गतीविना वित्त गेले

वित्ताविना शूद्र खचले।

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी सावित्रीबाईवर सोपविली. आणि यानंतर जोतीबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. महात्मा फुले हे महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक, सामाजिक विषमता टिकवून धरण्यास जातिभेद कारणीभूत आहेत, हे त्यांनी निर्भीडपणे मांडले. शूद्रातिशूद्राच्या प्रगतीच्या मार्गात जर सर्वांत मोठा अडथळा कोणता असेल तर तो जातिभेदाचा; म्हणूनच त्यांनी मूलगामी समाजपरिवर्तनासाठी जातिभेदावर हल्ला चढवला. जातीसंस्थेच्या उत्पतीसंबंधी फुले यांनी स्वतःच्या साहित्यात त्यासंदर्भातील आपली मते मांडली. आहेत.दुर्गाबाई भागवत म्हणतात: 'भरभराट इच्छिणाऱ्या कोणत्याही समाजाला परंपरा मांडून दाखवणारे मनू लागतात. त्याचप्रमाणे मनूंनी मांडून ठेवलेली परंपरा जेव्हा घट्ट खोडागत बनून पुढची वाट थांबवून धरतात, तेव्हा मनूंना आव्हान करणारे फुलेसुद्धा आवश्यक असतात.

महात्मा फुलेंनी शिक्षणाची प्रेरणा अहमदनगरच्या मिस फरार यांच्याकडून घेतली होती (मेजर कँडी फुलेंच्या शाळेला पुस्तके पुरवत असत). त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्याचं त्याच बरोबर अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केलीत. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. जोतीराव जसे सार्वजनिक ठिकाणी उपदेशपर भाषणे करीत, तसेच ते शाळांतील शिक्षकांना आदर्श पाठ देऊन शिक्षकांनी मुलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती साधने नि उपकरणे वापरावी म्हणून शिक्षकांनाही उत्तेजन देत असत. स्थापत्यशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे सत्यशोधक समाजाने एक अर्ज केला. त्या महाविद्यालयामध्ये काही प्रमाणात गरीब ब्राह्मणेतर विद्यार्थांना निःशुल्क शिक्षण द्यावे, अशी त्यांनी प्रार्थना केली होती. त्या अर्जातील त्यांचा हेतू सफल झाला.

महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची आणि पराक्रमाची ओळख इथल्या बहुजन समाजाला पोवाड्याच्या माध्यमातून करून दिली आहे. 'रयतेचा राजा' म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना-प्रसंगांची आठवण करून देऊन येथील बहुजन समाजाचा आत्मविश्वास परत मिळवून देण्याचे कार्य जोतिरावांनी केले आहे. तसेच 'इशारा' या ग्रंथाच्या आधारे जातीचा प्रश्न समाजासमोर मांडला आहे. 'सत्सार' या नियतकालिकाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले आहे. याबरोबरच सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाच्या माध्यमातून जोतिरावांनी धार्मिक, सामाजिक, नैतिक, व्यावहारिक प्रश्नांची चर्चा केली आहे. एकंदरीतच महात्मा फुले ज्या काळात लेखन करीत होते, त्या काळाचा विचार करता त्यांच्या साहित्याने मराठी साहित्यविश्वात मोलाची भर घातली आहे, असे मला वाटते. त्यांच्या प्रेरणेतून आंबेडकरवादी साहित्य जन्माला आले. तसेच दलित साहित्याची एक व्यापक चळवळ उभी राहिली. त्यामधून कविता, कथा, कादंबरी आणि आत्मकथनासारखा



ISBN 978-93-100-0078-8



CamScanner

नवा वाड्मयप्रकार जन्माला आला. मराठी साहित्यातील आंबेडकरी आणि दलित साहित्याची पाळेमुळे आपणास फुलेंच्या साहित्यात, विचारांत शोधावी लागतात, त्यामुळे महात्मा फुलेंच्या साहित्याने मराठी साहित्यविश्व अधिकाधिक समृद्ध केले आहे.

**संदर्भग्रंथ** : १) कुलकर्णी कुसुम 'प्रबोधनपर्व', सिंहवाणी प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती २६ जाने. २००२.
२) डॉ. किरवले कृष्णा, 'दलित चळवळ आणि साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र., आ. जून १९९६.
३) डॉ. आढाव बाबा, पुरोगामी सत्यशोधक' (त्रैमासिक) ऑक्टो-नोव्हें-डिसेंबर, १९९३, साई प्रकाशन पुणे.
४) भिडे जी. एल., पाटील एन.डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सोळावी आवृत्ती, नोव्हेंबर २००८.
५)हरी नरके – म.फुले साहित्य आणि चळवळ,प्रकाशक:प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई,प्रथमआवृत्ती-२००६.



ISBN 978-93-100-0078-8

J. S. M. College, Alibag-Raigad (M.S.) 402 201

CamScanner